# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१४ – १५

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

लोकमत पुणे, गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर २०१४ ८



राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात संविधानातील उद्देशीकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.

### राजगुरु विद्यालयात संविधान दिन

दावडी : राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयामध्ये संविधान दिन (दि.२६) साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात राज्यघटनेबद्दल माहिती देण्यात आली. संविधानातील उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.

भारतीय संविधानाच्या सरनाम्यात नमूद केलेली मुल्ये ही आपल्या राजकीय, सामाजिक जीवनाची चौकट व भारतीय नागरिक तत्वाचा पाया आहे. ही मुल्ये तांत्रिक दृष्ट्या वाचली न जाता अर्थासह मनात रुजली पाहिजे, या हेतूने उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी भारतीय राज्यघटनेची ओळख करुन दिली. वाचन प्रा.डॉ. संजय शिंदे यांनी केले. यावेळी उपप्राचार्य डी.बी.सुकाळे, पर्यवेक्षक प्रा.जी.बी.शिंदे, प्रा.डी.जे.टाकळकर व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख